# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-16.04.2026** **वार- गुरुवार**

---

**<u>मुख्यमंत्री</u>**

नव्या काळांच्या आव्हानांना सामोरे जावून ग्लोबल ब्रँड बनविण्याचा आत्मविश्वास चितळे बंधूनी दाखविला आहे. ग्लोबल ब्रँड असेल्या राज्यातील खाद्य उद्योगाला प्रगत ब्रँडच्या रुपात जागतिक पातळीवर नेण्यासाठी आवश्यक सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पुण्यात दिली. त्यांच्या हस्ते रांजे इथं उभारण्यात आलेल्या चितळे बंधू व्हिजन पार्कचे उद्घाटन करताना ते बोलत होते. या कार्यक्रमाला उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, आमदार भीमराव तापकीर, यांच्यासह इंद्रनील चितळे, गोविंद चितळे, श्रीकृष्ण चितळे, केदार चितळे आदी उपस्थित होते.
स्वच्छता आणि शुद्धतेच्या बाबतीत कुठेही मानवी हस्तक्षेप नसलेली, नूतनीकरणीय ऊर्जेचा वापर असलेली दर्जेदार यंत्रणा या पार्कमध्ये उभारण्यात आली आहे. शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थी आणि वितरकांनाही हा अनुभव व्हिजन पार्कमध्ये औद्योगिक सहलीच्या माध्यमातून घेता येईल.

**<u>मातृत्त्ववंदन</u>**

प्रधानमंत्री मातृत्व वंदना योजनेच्या माध्यमातून गर्भवती महिलांना मोठा दिलासा मिळाला असून पुणे जिल्ह्यात ३२ हजाराहून अधिक नवीन लाभार्थ्यांची नोंदणी झाली असल्याचं जिल्हा परिषदेच्या महिला आणि बालविकास विभागाच्या वतीने आज सांगण्यात आलं. योजनेचा लाभ अधिकाधिक पात्र महिलांपर्यंत पोहोचविण्याच्यादृष्टीने हे पाऊल महत्त्वपूर्ण ठरले आहे. जिल्ह्यातील ग्रामीण भागात ४ हजार ३९५ आणि नागरी भागात १ हजार ६९९ असे एकुण ६ हजार ९४ अंगणवाडी केंद्र कार्यरत आहेत. पुणे महानगरपालिकेअंतर्गत १० हजार, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका एकंदर साडेतीन हजार लाभार्थ्यांची नोंद करण्यात आली आहे. प्रधानमंत्री मातृत्व वंदना योजनेअंतर्गत गरोदर महिलांचं आहार आणि आरोग्य चांगले राहावे तसंच मुलींच्या जन्मास प्रोत्साहन मिळावं याकरता विविध उपक्रम राबवले जातात. या माध्यमातून जिल्ह्यातील सर्व पात्र महिलांना योजनेचा लाभ मिळावा, यासाठी विभागाकडून नियोजनबद्ध कार्यवाही करण्यात येत आहे.

**<u>राम-नदी</u>**

राम नदीला पुनरुज्जीवित करण्यासाठी तिच्या उगमस्थानापासून संगमापर्यंत सखोल अभ्यास होणं आवश्यक आहे. या नदीची वारी-परिक्रमा व्हावी. असं प्रतिपादन ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ आणि गोमुखचे अध्यक्ष प्रा. विजय परांजपे यांनी आज पुण्यात केलं. राम नदीशी नाते निर्माण व्हावे, या उद्देशाने गेल्या पाच वर्षांपासून कोहिनूर कट्टा आयोजित कोहिनूर राम नदी चित्रपट महोत्सवाचा शुभारंभ आज प्रा. विजय परांजपे यांच्या हस्ते झाला. त्या वेळी ते ‘राम नदी काल-आज-उद्या’ या विषयावर बोलत होते. कोहिनूर ग्रुपचे संचालक विनीत गोयल, संयोजक वीरेंद्र चित्राव, अनिल गायकवाड आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**<u>आशा</u>**

सप्तसुरांवर अधिराज्य गाजविणाऱ्या गायिका पद्मविभूषण आशा भोसले
यांना सांगीतिक कार्यक्रमातून आदरांजली वाहिली जाणार आहे. पूना गेस्ट हाऊस स्नेह मंचतर्फे ‘आशा द होप’ कार्यक्रमात सलग १२ तास गायन करुन स्वरपुष्प वाहिले जाणार आहे.

विविध मान्यवर गायकांच्या सहभाग असलेला हा कार्यक्रम येत्या सोमवारी लक्ष्मी रस्ता इथल्या पूना गेस्ट हाऊस सभागृहात सकाळी १० ते रात्री १० या वेळात आयोजित करण्यात आला आहे. अशी माहिती पूना गेस्ट हाऊसचे संचालक डॉ. किशोर सरपोतदार यांनी निवेदनाद्वारे दिली आहे.

**पिंपरी चिंचवड शाळा**

२०२६-२७ या शैक्षणिक वर्षात पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील १० खाजगी इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळा शासनाची आवश्यक परवानगी न घेता अनधिकृतरित्या चालविण्यात येत असल्याचं समोर आले आहे. शाळा नियमबाह्य पद्धतीने सुरू असल्याच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागामार्फत सर्व पालकांना सतर्कच्या सुचना देण्यात आल्या असून  संबंधित पालकानी खबरदारी घेण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

**अकरावी**

राज्यातील शैक्षणिक सत्र 2026-27 साठी इयत्ता अकरावी प्रवेशाची केंद्रीय ऑनलाईन प्रक्रिया 10 एप्रिलपासून सुरू झाली आहे. या प्रक्रियेत विद्यार्थ्यांना प्रवेश अर्जाचा भाग-1 भरून नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. दहावीचा निकाल जाहीर झाल्यानंतर अर्जाचा भाग-2 भरण्याची सुविधा सुरू होणार असल्याची माहिती शिक्षण संचालनालयाने दिली आहे. राज्य मंडळाशी संलग्न सर्व कनिष्ठ महाविद्यालये व उच्च माध्यमिक विद्यालयांमध्ये प्रवेश घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज करणे अनिवार्य आहे. इतर मंडळातून दहावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनाही याच पद्धतीने अर्ज करावा लागणार आहे. ऑनलीन अर्ज भरण्याची अंतिम मुदत येत्या ३० एप्रिलपर्यंत आहे.

**हवामान**

पुणे शहर आणि परिसरांत दिवसेंदिवस तापमानात वाढ होत असून उष्माघाताचा धोका निर्माण झाला आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालयांमध्ये उष्माघाताच्या रुग्णांसाठी आवश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध असून आपत्कालीन परिस्थितीत त्वरित उपचार मिळण्यासाठी आरोग्य यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. नागरिकांनी लक्षणांकडे दुर्लक्ष न करता वेळेवर उपचार घेणे अत्यंत आवश्यक आहे. असं महापालिकेनं म्हटलं आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू, संध्याकाळी सहा वाजता विविध भारती पुणे केंद्रावर ताज्या पुणे वृत्तांत सह. नमस्कार.**